# मुंबई

- सोमवार, २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२६
- वर्ष : १४
- अंक : ३२
- पृष्ठ : ४
- किंमत : २ रुपए
- PRGI Regd. No: MAHMAR/2013/50698

मराठी साप्ताहिक

# सातारा प्रतिनिधी

संपादक : एकनाथ दगडू गाडे

www.satarapratinidhi.com



**जाहिरात करा,**
**योग्य वाचकांपर्यंत पोहोचा**

आपल्या व्यवसायाची, सेवा, उत्पादन, संस्था, कार्यक्रम किंवा सार्वजनिक उपक्रमाची माहिती प्रभावीपणे पोहोचवा.

व्यवसाय | संस्था | कार्यक्रम | उत्पादने आणि सेवा | सार्वजनिक उपक्रम

आपल्या जाहिरातीसाठी संपर्क साधा.
संपर्क : +91 98213 49985


## दुष्काळामुळे राज्याच्या तिजोरीवर ताण; सर्व विभागांच्या निधीत २० टक्के कपात

■ मुंबई प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील दुष्काळी परिस्थिती, घटणाऱ्या महसुलाची शक्यता आणि वाढत्या आर्थिक भाराच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व सरकारी विभागांना खर्चात किमान २० टक्के कपात करण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यातील ३५८ पैकी ३०४ तालुक्यांमध्ये (८५ टक्के) दुष्काळ घोषित करण्यात आला असून जलसंधारण, पाणीपुरवठा, चारा आणि दुष्काळ निवारणासाठी मोठा निधी खर्च करावा लागणार आहे.

राज्याच्या महसुली खर्चातील ५० टक्क्यांहून अधिक रक्कम सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्तिवेतन आणि कर्जावरील व्याजाच्या परतफेडीसाठी खर्च होते. त्यात लोकप्रिय कल्याणकारी योजना आणि विकासकामांवरील वाढत्या खर्चामुळे तिजोरीवरील ताण अधिक वाढला आहे. राज्यावर सध्या दहा लाख कोटी रुपयांहून अधिक कर्ज आहे. महिलांसाठीची 'लाडकी बहीण' योजना सुरू ठेवावी लागणार असून, यंदाचा खरीप आणि रब्बी हंगाम वाया जाण्याची शक्यता असल्याने राज्याच्या उत्पन्नात घट होण्याची भीतीही व्यक्त होत आहे.



दिवाळीसाठी एक कोटीहून अधिक शेतकऱ्यांना प्रत्येकी पाच हजार रुपये अग्रिम देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर पाच हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडला आहे. याशिवाय, जुलै महिन्यात राज्य सरकारने सुमारे ३५ ते ४० हजार कोटी रुपयांची शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर केली आहे.

शेतकरी कर्जमाफी, जलसंधारण, पाणीपुरवठा, चारा आणि दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांसाठी आगामी सात ते आठ महिन्यांत अंदाजे एक लाख कोटी रुपये कर्ज काढून खर्च करावे लागण्याचा अंदाज आहे. या वाढत्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी खर्चात काटकसर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व विभागांच्या सचिवांशी चर्चा केली असून वित्त विभागाने निधी कपातीच्या सूचना दिल्या आहेत.

मुख्यमंत्र्यांनी अनावश्यक खर्च टाळून गरजेच्या कामांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिले आहेत. नव्या विकासकामांना परवानगी देताना तसेच रस्ते आणि सिंचन प्रकल्पांवरील खर्चाबाबत काटकसरीचे धोरण स्वीकारण्यास सांगण्यात आले आहे.मात्र, जनतेचा रोष टाळण्यासाठी शिष्यवृत्ती, पोषण आहार, आरोग्य व शिक्षणावरील खर्चात मोठी कपात न करण्याच्या सूचना.

## थोडक्यात

### ग्रामीण भागात महागाईचा अधिक फटका!

मुंबई प्रतिनिधी

**मुंबई**: महाराष्ट्रात सप्टेंबर 2026 मध्ये ग्रामीण महागाईचा दर 6.12 टक्के, तर शहरी महागाईचा दर 4.56 टक्के नोंदवला गेला. त्यामुळे ग्रामीण भागातील महागाई शहरांच्या तुलनेत 1.56 टक्के-बिंदूंनी अधिक आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना सणासुदीच्या काळात वाढत्या महागाईचा अतिरिक्त भार सहन करावा लागत आहे.

राष्ट्रीय पातळीवर खाद्यपदार्थांच्या महागाईचा दर ऑगस्टमधील 5.97 टक्क्यांवरुन सप्टेंबरमध्ये 7.74 टक्क्यांवर पोहोचला. किरकोळ महागाईचाही दर ऑगस्टमधील 4.82 टक्क्यांवरुन सप्टेंबरमध्ये 5.54 टक्के झाला. महागाई वाढण्याची ही सलग नववी वेळ असल्याचे नमूद करण्यात आले आहे.



तामिळनाडू (6.81%), ओडिशा (6.70%), मध्य प्रदेश (6.68%), तेलंगणा (6.64%) आणि आंध्र प्रदेश (6.29%) या राज्यांत महाराष्ट्रापेक्षा अधिक महागाई नोंदवली गेली.

उत्तर प्रदेशात हा दर 6.08 टक्के, तर कर्नाटकात 5.86 टक्के आहे. महाराष्ट्राचा एकूण महागाई दर 5.18 टक्के असल्याचे आकडेवारीत नमूद आहे.

कमकुवत किंवा अनियमित मान्सूनमुळे कृषी उत्पादनांच्या पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. त्यात आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमती 100 डॉलरच्या पुढे गेल्याने आयात आणि वाहतूक खर्चावरही अतिरिक्त भार पडला आहे. अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे ग्रामीण कुटुंबांचे आर्थिक गणित बिघडत आहे.

### आठव्या वेतन आयोगाच्या मुंबई दौऱ्यात काय घडलं? महत्वाची अपडेट समोर

मुंबई प्रतिनिधी

**मुंबई**: आठव्या केंद्रीय वेतन आयोगाचा मुंबई दौरा पूर्ण झाला असून, दोन दिवसांच्या या दौऱ्यात केंद्रीय कर्मचारी, कर्मचारी संघटना आणि युनियनच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली. यावेळी महागाई भत्ता (डीए), महागाई सवलत (डीआर) आणि बेसिक पेबाबत विविध मागण्या मांडण्यात आल्या.

सध्या केंद्रीय कर्मचाऱ्यांचा डीए बेसिक पेच्या 60 टक्क्यांवर पोहोचला आहे. महागाई भत्ता निश्चित करण्यासाठी औद्योगिक कामगारांचा अखिल भारतीय ग्राहक किंमत निर्देशांक (AICPI-IW) विचारात घेतला जातो. सरकार वर्षातून दोनदा, 1 जानेवारी आणि 1 जुलैपासून डीएमध्ये बदल करते.

फेडरेशन ऑफ नॅशनल पोस्टल ऑर्गनायझेशन्सने डीए 25 टक्क्यांपेक्षा अधिक झाल्यानंतर तो बेसिक पेमध्ये विलीन करण्याची मागणी केली आहे. तर भारत पेन्शनर्स समाजाने डीएमध्ये दर तीन महिन्यांनी बदल करण्याची मागणी केली आहे. काही संघटनांनी डीए निश्चित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या निर्देशांक पद्धतीचा आढावा घेण्याचीही मागणी केली आहे.

आठवा वेतन आयोग या मागण्यांवर विचार करून सरकारला शिफारशी करू शकतो. मात्र, डीए बेसिक पेमध्ये विलीन करायचा की त्यात बदल अधिक वेळा करायचे, याचा अंतिम निर्णय सरकार घेणार आहे. या निर्णयात सरकारी तिजोरीवरील आर्थिक भारही महत्त्वाचा ठरणार आहे.




## 'हा लोकशाहीचा खून'; व्हायरल ऑडिओ क्लिपवर राज ठाकरेंची टीका

■ मुंबई प्रतिनिधी

मुंबई : मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी पत्रकार परिषदेत ऐकवलेल्या कथित ऑडिओ क्लिपमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या क्लिपमध्ये खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जरांगे यांना ५०० कोटी रुपये दिल्याचा उल्लेख असल्याचा दावा करण्यात आला आहे. यावर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ट्विट करत भाजपवर टीका केली. 'हा लोकशाहीचा खून आणि बलात्कारच आहे,' असे म्हणत राज ठाकरे यांनी समाजमाध्यमे आणि प्रसारमाध्यमांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप केला.

२९ मिनिटांच्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये भाजपचे काही पदाधिकारी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक ज्येष्ठ पदाधिकारी आणि स्वतःला राजकीय विश्लेषक म्हणवणाऱ्या व्यक्तींच्या संभाषणाचा उल्लेख आहे. या संभाषणात ५०० कोटी रुपये, माध्यमांवर दबाव आणणे आणि लोकांचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी धार्मिक मुद्दे पुढे करण्याबाबत चर्चा असल्याचा दावा ठाकरे यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या क्लिपचा फॉरेन्सिक अहवाल मागवला आहे. ही क्लिप दोन वर्षांपूर्वीची असण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. मात्र, ही क्लिप बाहेर कशी आली आणि ती कोणी बाहेर आणली, याचीही चौकशी व्हावी, अशी मागणी राज ठाकरे यांनी केली. सरकारमध्ये एकमेकांना अडचणीत आणण्याचे राजकारण सुरू असल्याचेही ते म्हणाले. फॉरेन्सिक अहवालाच्या तांत्रिक बाबींमध्ये लोकांना गुंतवून ठेवू नका. मुख्यमंत्र्यांनी निष्पक्षपणे कारवाई करून आपली भूमिका स्पष्ट करावी.

अन्यथा अहवाल सरकारच्या सोयीनुसार तयार केला जाईल, असा इशाराही राज ठाकरे यांनी दिला.




## २८२ माजी अग्निवीरांना नियुक्ती; सरकारी नोकरीत १० टक्के आरक्षण

■ मुंबई प्रतिनिधी

मुंबई : राज्यातील माजी अग्निवीरांना शासकीय सेवेत सामावून घेण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी सुरू झाली असून, पहिल्या टप्प्यातील २८२ माजी नौदल अग्निवीरांना पोलिस शिपाई पदावर नियुक्ती देण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. यासाठी नियुक्तीचे आदेशही संबंधितांना देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती दिली.

महाराष्ट्रातील रहिवासी असलेल्या माजी अग्निवीरांसाठी राज्य सरकारच्या गट-क गणवेशधारी सेवांमध्ये १० टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. या भरतीसाठी आवश्यक नियमांमध्ये बदल करून नियुक्तीचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे.

माजी अग्निवीरांना गृह विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, वन विभाग आणि नगरविकास विभागासह विविध प्रशासकीय विभागांतील गणवेशधारी सेवांमध्ये नोकरी देण्याचा निर्णय राज्य सरकारने गेल्या महिन्यात घेतला होता. या निर्णयानुसार संबंधित उमेदवारांना भरतीच्या लेखी परीक्षेतून पूर्ण सूट देण्यात आली आहे. तसेच वयोमर्यादेत चार वर्षांची सवलत, शारीरिक कार्यक्षमता चाचणी आणि शारीरिक मानक चाचणीतून सूट देण्याची तरतूद करण्यात आली आहे. ज्येष्ठता, पदोन्नती आणि प्रशिक्षणासंदर्भातही सवलती देण्यात आल्या आहेत.

केंद्र सरकारने २०२२ मध्ये भूदल, नौदल आणि वायुदलासाठी अग्निपथ योजना सुरू केली. या योजनेंतर्गत १७.५ ते २१ वर्षे वयोगटातील तरुणांची चार वर्षांच्या कालावधीसाठी सैन्यदलात भरती केली जाते. या काळात अग्निवीरांना शिस्त, नेतृत्व, तांत्रिक कौशल्य, आपत्ती व्यवस्थापन, सुरक्षा आणि संघटनात्मक कार्यपद्धतीचे प्रशिक्षण दिले जाते. चार वर्षांची सेवा पूर्ण झाल्यानंतर कामगिरी, शिस्त आणि कौशल्याच्या निकषांनुसार २५ टक्के अग्निवीरांना कायमस्वरूपी सैन्यदलात सामावून घेतले जाते, तर उर्वरित ७५ टक्के अग्निवीर सेवामुक्त होतात.

राज्यातून २०२२ ते २०२५ या कालावधीत ५ हजार ६४८ तरुण अग्निवीर म्हणून सैन्यात दाखल झाले आहेत. त्यापैकी २ हजार ४९६ अग्निवीर यंदा सेवामुक्त होणार असून, पुढील वर्षी आणखी ३ हजार ९७७ अग्निवीर सेवामुक्त होणार आहेत.

पहिल्या टप्प्यात सेवामुक्त झालेल्या राज्यातील २८२ नौदल अग्निवीरांची यादी राज्य सरकारला प्राप्त झाली होती. त्यानुसार १५० खलाशी डेकसाईड आणि १३२ खलाशी इंजिनसाईड अशा एकूण २८२ जणांना पोलिस शिपाई म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे. राज्यातील माजी अग्निवीरांना शासकीय सेवेत संधी उपलब्ध करून देण्यासाठी घेतलेल्या या निर्णयामुळे आगामी काळात सेवामुक्त होणाऱ्या अग्निवीरांनाही आरक्षण आणि विविध सवलतींचा लाभ मिळण्याचा मार्ग उपलब्ध झाला आहे.



## पुणे विभागातील पदवीधर-शिक्षक मतदारसंघांत महायुतीच बाजी मारणार; शिवेंद्रसिंहराजेंचा दावा

■ सातारा प्रतिनिधी

**शाहूपुरी**: पुणे विभाग पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुतीचे दोन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी व्यक्त केला. मतदान केंद्राला भेट दिल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी महायुतीच्या विजयाचा ठाम दावा केला. त्यांच्या या वक्तव्यामुळे मतदानानंतरच्या राजकीय समीकरणांबाबत उत्सुकता वाढली आहे.

सातारा जिल्ह्यात पदवीधर आणि शिक्षक मतदारांचा मतदानासाठी चांगला प्रतिसाद मिळाला असून, निवडणूक प्रक्रिया शांततेत सुरू असल्याचे शिवेंद्रसिंहराजे यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली महायुतीचे दोन्ही उमेदवार चांगली कामगिरी करतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

पुणे विभागातील या दोन्ही मतदारसंघांच्या निवडणुकीकडे महायुतीसह विरोधी पक्षांचेही लक्ष लागले आहे. शिक्षक आणि पदवीधर मतदारांचे मतदानाचे प्रमाण, उमेदवारांना मिळालेला प्रतिसाद तसेच विविध राजकीय पक्षांनी केलेली बांधणी यांचा निकालावर काय परिणाम होतो, हे महत्त्वाचे ठरणार आहे.

सातारा जिल्ह्यात शिक्षक मतदारसंघासाठी ८९.३९ टक्के, तर पदवीधर मतदारसंघासाठी ६६.९२ टक्के मतदान झाले. शिक्षक मतदारांचा वाढलेला सहभाग आणि पदवीधरांच्या मतदानाची टक्केवारी यामुळे दोन्ही मतदारसंघांतील निकालाबाबत राजकीय वर्तुळात विविध अंदाज बांधले जात आहेत. महायुतीच्या दोन्ही उमेदवारांना किती मताधिक्य मिळते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



## बंद दाराआड बैठक अन् बडेकरांची माघार; साताऱ्यात चर्चांना उधाण!

■ सातारा प्रतिनिधी

सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस आणि शिवसेनेतील राजकीय समीकरणे चर्चेत आली आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि शिवसेना नेते तथा पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यात कराड येथे बंद दाराआड बैठक झाली. या बैठकीत जागावाटप आणि निवडणुकीच्या समीकरणांवर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातून शिवसेनेचे माजी आमदार दीपक चव्हाण निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या विरोधात काँग्रेसचे कराड पंचायत समिती सदस्य रवींद्र बडेकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यामुळे या जागेवरील लढतीची चुरस वाढली होती. मात्र, दोन्ही नेत्यांच्या बैठकीनंतर बडेकर यांनी उमेदवारी मागे घेत दीपक चव्हाण यांना पाठिंबा जाहीर केला. यासंदर्भातील पत्रही त्यांनी चव्हाण यांच्याकडे सुपूर्द केले. काँग्रेसच्या या भूमिकेमुळे सातारा जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील राजकीय घडामोडींना वेग आला असून सहकार क्षेत्रात या निर्णयाची चर्चा सुरू झाली आहे.



## भाजप आमदारानेच ऑडिओ क्लिप लीक केली; संजय राऊतांचा दावा

■ मुंबई प्रतिनिधी

**मुंबई**: शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांनी आंदोलक मनोज जरांगे यांना ५०० कोटी रुपये दिल्याचा आरोप करणारी व्हायरल ऑडिओ क्लिप भाजपच्या एका आमदारानेच लीक केल्याचा दावा ठाकरेसेनेचे नेते संजय राऊत यांनी शनिवारी केला. भाजपमधील जीवघेण्या स्पर्धेतून हा प्रकार घडल्याचेही त्यांनी म्हटले.

पत्रकारांशी बोलताना राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधी गुन्हा नोंदवून त्यानंतर ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक तपासणी करावी, अशी मागणी केली. मात्र, या चौकशीतून काहीही निष्पन्न होणार नसल्याचा दावाही त्यांनी केला.

जरांगे यांच्याशी झालेल्या चर्चेत सहभागी असलेल्या भाजपच्या एका आमदाराने ही क्लिप लीक केल्याचे राऊत यांनी आमदाराचे नाव न घेता सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांचे विश्वासू मानले जाणारे आमदार प्रसाद लाड यांनी ऑगस्टमध्ये मराठा आरक्षणासाठीच्या उपोषणादरम्यान जरांगे यांच्याशी चर्चा केली होती.

मुख्यमंत्र्यांचे राज्यावरील नियंत्रण सुटले असून, मुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून फडणवीस अपयशी ठरल्याचा आरोप राऊत यांनी केला. अंतर्गत ऑडिओ क्लिप लीक होत असेल, तर गृहखातेच सरकारविरोधात गेले आहे, असे राऊत म्हणाले.

फडणवीस-शिंदे यांच्यातील शीतयुद्ध शिगेला पोहोचले असून, एकमेकांना संपवण्यासाठी दोघेही कोणत्याही थराला जाऊ शकतात, असा आरोप त्यांनी केला.



## दुष्काळाच्या झळा ...! लोडशेडिंग यंदा पक्के; मुंबई, पुण्यातही करावे लागण्याची शक्यता...

■ मुंबई प्रतिनिधी

**मुंबई**: राज्यात यंदा विजेची मागणी वाढल्याने वीजकपातीचे संकट निर्माण झाले आहे. वीजतज्ज्ञ अशोक पेंडसे यांच्या मते, ९ ऑक्टोबर रोजीच राज्यात सुमारे १,८०० मेगावॅट विजेचे भारनियमन करावे लागले. महावितरणचे राज्यभरात ३ कोटी २० लाख ग्राहक असून, त्यापैकी ७५ टक्के घरगुती आणि १५ टक्के शेतीसाठी वीज वापरणारे ग्राहक आहेत.

राज्यात सुमारे ५,३०० मेगावॅट सौरऊर्जा तयार होते. मात्र, ही वीज सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेतच मिळते. सकाळी आणि संध्याकाळी विजेची गरज वाढते, तेव्हा सौरऊर्जेचा उपयोग होत नाही. ऑक्टोबरमधील वाढते तापमान, एसीचा वाढलेला वापर, पावसाची कमतरता आणि भूजल पातळी घटल्यामुळे विजेची मागणी सुमारे १० टक्क्यांनी वाढली आहे.

वीजनिर्मितीसाठी लागणाऱ्या कोळशाचा साठाही कमी झाला आहे. वीजनिर्मिती केंद्रांकडे साधारण १२ ते १५ दिवसांचा कोळसा असणे आवश्यक असताना सध्या केवळ ३ ते ४ दिवसांचा साठा असल्याचे पेंडसे यांनी सांगितले.

वीजकपात टाळण्यासाठी कोळशाचा पुरवठा वाढवणे, अतिरिक्त वीज खरेदी करणे आणि वीज साठवण्याची व्यवस्था वाढवणे गरजेचे आहे. तरीही भारनियमन करावे लागल्यास नागरिकांना आधीच वेळापत्रक जाहीर करावे. मुंबई, पुणे आणि ठाण्यासारख्या शहरांतही वीजकपात करण्याची शक्यता नाकारता येत नाही.



# संपादकीय

## राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा धुरळा उडतोय; बळीराजा मात्र दिवाळीतही मदतीच्या प्रतीक्षेत!

महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या आठवड्यापासून ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराच्या आरोपांवरून राजकीय वादळ उठले आहे. कथित ऑडिओ क्लिप, आरोप-प्रत्यारोप, खुलासे आणि राजकीय दावे यांच्या फैरी झडत आहेत. या प्रकरणातील सत्य काय, आरोपांना कितपत आधार आहे आणि त्यातून नेमके काय निष्पन्न होणार, हे तपासातून स्पष्ट होईलच. मात्र, या राजकीय धुरळ्यात महाराष्ट्रातील एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष होण्याचा धोका निर्माण झाला आहे. तो प्रश्न म्हणजे शेतकऱ्यांची कर्जमाफी, पीक नुकसानभरपाई आणि आर्थिक मदतीची प्रतीक्षा!

राजकारण्यांच्या आरोपांना माध्यमांतून प्रसिद्धी मिळते, राजकीय नेत्यांच्या वक्तव्यांवर चर्चा रंगते आणि सत्ताधारी-विरोधक एकमेकांना लक्ष्य करण्यात व्यस्त राहतात. पण याच महाराष्ट्रात शेतकरी मात्र आपल्या शेतात झालेल्या नुकसानीचा हिशेब मांडत बसला आहे. एका बाजूला राजकीय आरोपांच्या कोट्यवधींच्या आकड्यांची चर्चा सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्याच्या घरात दिवाळीचा दिवा लावण्यासाठीही पैशांची चणचण आहे. हा विरोधाभास केवळ अस्वस्थ करणारा नाही, तर राज्याच्या प्राधान्यक्रमांवर प्रश्न उपस्थित करणारा आहे.

**दिवाळी आली, पण बळीराजाच्या हातात मदतीचा पैसा कधी येणार?**

दिवाळी म्हणजे आनंदाचा, उत्साहाचा आणि नव्या आशेचा सण. सर्वसामान्य कुटुंबे या सणासाठी वर्षभर नियोजन करतात. मात्र, शेतकऱ्याच्या आयुष्यातील दिवाळी अनेकदा कर्जाच्या ओझ्याखाली दबलेली असते. खरीप हंगामात पिकांसाठी केलेला खर्च, बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि शेतीसाठी घेतलेले कर्ज यांचा डोंगर त्याच्यासमोर उभा असतो. त्यात अतिवृष्टी, अवकाळी पाऊस किंवा अन्य नैसर्गिक संकटांमुळे पिकांचे नुकसान झाले, तर संपूर्ण आर्थिक गणित कोलमडते.

अशा परिस्थितीत शेतकऱ्याला कर्जमाफीची आणि नुकसानभरपाईची अपेक्षा असते. शासनाकडून मदतीच्या घोषणा झाल्या, पंचनामे करण्यात आले किंवा पात्र लाभार्थ्यांची यादी तयार झाली, तरी प्रत्यक्ष खात्यात पैसे जमा होईपर्यंत शेतकऱ्याची प्रतीक्षा संपत नाही. घोषणांमुळे आशा निर्माण होते; परंतु त्या आशेचे रूपांतर प्रत्यक्ष मदतीत झाले, तरच सरकारच्या निर्णयांना अर्थ प्राप्त होतो.

शेतकऱ्याला आश्वासनांचे गाजर नको, तर संकटातून बाहेर पडण्यासाठी प्रत्यक्ष आर्थिक आधार हवा आहे.

**प्रकल्पांच्या घोषणांचा गाजावाजा; शेतीच्या प्रश्नांवर ठोस कृती कधी?**

राज्याच्या विकासासाठी पायाभूत सुविधा, उद्योग, मोठे प्रकल्प आणि गुंतवणूक आवश्यकच आहे. मात्र, विकासाच्या या प्रवासात शेती आणि शेतकरी मागे पडता कामा नये. मोठ्या प्रकल्पांच्या घोषणा करताना सरकारने शेतकऱ्यांच्या आर्थिक सुरक्षिततेलाही तितकेच महत्त्व द्यायला हवे.

शेतकऱ्याला पीक घेण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. पीक बाजारात गेल्यानंतर योग्य भाव मिळेल, याची खात्री नसते. उत्पादन खर्च वाढत असताना उत्पन्न मात्र अनिश्चित असते. अशा परिस्थितीत कर्जाची परतफेड कशी करायची, पुढील हंगामासाठी भांडवल कुठून आणायचे आणि कुटुंबाचा खर्च कसा भागवायचा, असे प्रश्न त्याला सतावत असतात. कर्जमाफी हा या संकटावरील एक महत्त्वाचा उपाय असला, तरी तोच एकमेव उपाय नाही. पीकविम्याची प्रभावी अंमलबजावणी, नुकसानभरपाईचे वेळेत वितरण, शेतमालाला रास्त भाव आणि शेतीसाठी परवडणारे कर्ज यांचीही तितकीच गरज आहे.

सरकारने कर्जमाफीबाबत निर्णय घेताना कोणते शेतकरी पात्र असतील, किती कर्ज माफ होईल, त्यासाठी किती निधी उपलब्ध आहे आणि अंमलबजावणीचे वेळापत्रक काय असेल, याबाबत स्पष्टता द्यायला हवी. कर्जमाफीच्या नावाखाली केवळ राजकीय आश्वासनांची मालिका सुरू राहिली, तर शेतकऱ्यांचा विश्वास टिकवणे कठीण होईल.

विदर्भ-मराठवाड्यातील आत्महत्या; व्यवस्थेच्या अपयशाची वेदनादायक आठवण

विदर्भ आणि मराठवाड्यातून शेतकरी आत्महत्यांच्या घटना सातत्याने समोर येत असतील, तर त्या केवळ आकडेवारी म्हणून पाहून चालणार नाही. प्रत्येक आत्महत्येमागे एक कुटुंब, अपूर्ण राहिलेली स्वप्ने, मुलांचे शिक्षण, कर्जाचा ताण आणि आर्थिक विवंचनेची वेदना असते. प्रत्येक प्रकरणामागील कारणे वेगवेगळी असू शकतात; त्यामुळे सर्व घटनांचे एकाच कारणाने स्पष्टीकरण देता येणार नाही. तरीही शेतीतील अनिश्चितता, कर्जाचा बोजा आणि उत्पन्नातील अस्थिरता या प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही.

शेतकरी संकटात असताना त्याला केवळ सहानुभूती नको, तर वेळेवर मदत, समुपदेशन, कर्जविषयक दिलासा आणि उत्पन्नाची शाश्वत व्यवस्था हवी. आत्महत्या रोखण्यासाठी सरकारने जिल्हानिहाय परिस्थितीचा आढावा घेऊन प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. संकटग्रस्त शेतकऱ्यापर्यंत मदत पोहोचवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा अधिक संवेदनशील आणि तत्पर असली पाहिजे.

**राजकीय गदारोळापेक्षा शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य द्या!**

लोकशाहीत आरोपांची चौकशी झालीच पाहिजे. सार्वजनिक जीवनातील आर्थिक व्यवहारांबाबत पारदर्शकता असलीच पाहिजे. मात्र, एखाद्या राजकीय प्रकरणावरून सुरू असलेल्या वादामुळे जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये. ५०० कोटींच्या कथित आरोपांमागील सत्य समोर येणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच शेतकऱ्यांच्या कर्जाचा प्रश्न सोडवणेही महत्त्वाचे आहे.

सत्ताधाऱ्यांनी कर्जमाफी आणि नुकसानभरपाईबाबत ठोस भूमिका स्पष्ट करावी. विरोधकांनीही केवळ आरोप-प्रत्यारोपांपुरते मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारावा. शेतकऱ्यांना दिलासा देणारे निर्णय, त्यांच्या अंमलबजावणीची कालमर्यादा आणि मदतीच्या वितरणाची पारदर्शक माहिती जनतेसमोर यायला हवी.

कारण महाराष्ट्राच्या राजकारणात कोण कोणावर आरोप करते, कोण कोणाला प्रत्युत्तर देते आणि कोणाची ऑडिओ क्लिप किती गाजते, यापेक्षा शेतकऱ्याच्या घरात चूल पेटते की नाही, त्याच्या मुलांची दिवाळी आनंदात जाते की नाही आणि त्याला कर्जाच्या विळख्यातून बाहेर पडण्याचा मार्ग मिळतो की नाही, हे अधिक महत्त्वाचे आहे.

राजकीय आरोपांच्या गदारोळात बळीराजाचा आवाज दबता कामा नये. दिवाळीच्या दिव्यांचा प्रकाश शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहोचवायचा असेल, तर घोषणांच्या पलीकडे जाऊन कर्जमाफी, नुकसानभरपाई आणि शेतीच्या आर्थिक स्थैर्यासाठी सरकारने ठोस कृती करणे ही काळाची गरज आहे.

# "५०० कोटीं...!"आरोपांचा धुरळा!

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या ५०० कोटी रुपयांच्या कथित ऑडिओ क्लिपने वादळ निर्माण केले आहे. मनोज जरांगे-पाटील यांनी समोर आणलेल्या या कथित ऑडिओ क्लिपमुळे आरोपांचे बॉम्ब फुटू लागले, राजकीय नेत्यांच्या तोफा धडाडू लागल्या आणि सत्ताधारी-विरोधकांमध्ये शब्दयुद्धाला तोंड फुटले. रामदास कदम यांची जरांगे यांच्यावरील टीका, भाजपचे आमदार प्रसाद लाड यांचे प्रत्युत्तर, भाजपचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी संजय राऊत यांच्याबाबत केलेले आरोप आणि राऊत यांची भूमिका या सगळ्या घडामोडींनी महाराष्ट्राचे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. मात्र, या गदारोळात एक मूलभूत प्रश्न अनुत्तरित आहे. ५०० कोटींच्या कथित व्यवहाराचे सत्य काय? आरोप करणाऱ्यांकडे कोणते पुरावे आहेत आणि या आरोपांची निष्पक्ष चौकशी होणार का?

लोकशाहीत प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे आणि सत्ताधाऱ्यांना जाब विचारणे हे विरोधकांचे कर्तव्य आहे. परंतु प्रश्न विचारणे आणि पुराव्यांशिवाय आरोप करणे यांत जमीन-अस्मानाचा फरक आहे. एखादी ऑडिओ क्लिप समोर आली म्हणून



**उमेश गायगवळे**
**9769020286**

त्यातील प्रत्येक शब्द सत्य मानता येत नाही. त्याचप्रमाणे, त्या क्लिपवर प्रश्न उपस्थित झाले म्हणून ती खोटी ठरवता येत नाही. ध्वनिमुद्रणाची सत्यता, आवाजांची ओळख, संभाषणाचा संदर्भ आणि त्यात फेरफार झाला आहे का, या बाबींची शास्त्रीय पडताळणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे या प्रकरणात कोणाची राजकीय ताकद किती, कोणाची वक्तृत्वशैली आक्रमक किती किंवा कोणाचा आवाज मोठा किती, यापेक्षा पुरावे किती ठोस आहेत, हा मुद्दा निर्णायक ठरला पाहिजे.

रामदास कदम यांनी जरांगे यांच्यावर केलेली टीका आणि त्यासाठी वापरलेली भाषा यामुळे वादाची तीव्रता वाढली. राजकीय मतभेद असू शकतात, आरोप-प्रत्यारोपही होऊ शकतात; पण सार्वजनिक जीवनात भाषेची मर्यादा पाळण्याची जबाबदारी प्रत्येक नेत्याची असते. एखाद्या आरोपाला उत्तर देण्यासाठी वैयक्तिक टीकेचा आधार घेण्यापेक्षा संबंधित मुद्द्यांवर पुराव्यांसह बोलणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण वैयक्तिक शेरेबाजीच्या धुरळ्यात मूळ प्रश्न झाकला जाण्याचा धोका असतो. जनतेला नेत्यांमधील शाब्दिक कुस्ती पाहण्यात नव्हे, तर आरोपांमागचे वास्तव जाणून घेण्यात रस आहे.

भाजपचे प्रसाद लाड यांनी दिलेले प्रत्युत्तर आणि पक्षाचे प्रवक्ते नवनाथ बन यांनी या कथित ऑडिओ क्लिपमागे संजय राऊत यांची भूमिका असल्याचा केलेला आरोप यामुळे राजकीय संघर्षाला नवे वळण मिळाले आहे. मात्र, आरोप म्हणजे पुरावा नव्हे. एखाद्या नेत्याचे नाव घेऊन संशय व्यक्त करणे सोपे असते; त्या संशयाला तथ्यांची जोड देणे कठीण असते. संजय राऊत यांच्यावर आरोप झाला म्हणून त्यांचा सहभाग सिद्ध होत नाही आणि त्यांनी आरोपांचे खंडन केले म्हणून सर्व प्रश्न संपतही नाहीत. या प्रकरणात व्यक्तींच्या राजकीय ओळखीपेक्षा पुराव्यांचे महत्त्व मोठे असले पाहिजे. अन्यथा, प्रत्येक गंभीर विषयाला पक्षीय रंग देऊन मूळ प्रश्नापासून जनतेचे लक्ष विचलित करण्याची प्रवृत्ती बळावेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी विशेष तपास पथक अर्थात एसआयटी स्थापन करण्याची घोषणा केली असून, कथित ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक तपासणी करण्याची भूमिकाही मांडली आहे. आता या घोषणेची खरी कसोटी लागणार आहे. चौकशीची घोषणा करणे ही सुरुवात असते; निष्पक्ष चौकशी करून निष्कर्ष जनतेसमोर ठेवणे ही खरी जबाबदारी असते. तपास यंत्रणांनी कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता उपलब्ध पुराव्यांची तपासणी केली पाहिजे. क्लिप अस्सल असेल तर त्यातील संभाषणाचा संदर्भ आणि त्यातून पुढे येणाऱ्या बाबी स्पष्ट झाल्या पाहिजेत. क्लिपमध्ये फेरफार झाल्याचे निष्पन्न झाले, तर त्यामागील वस्तुस्थितीही समोर आली पाहिजे. तपासाचा निष्कर्ष कोणाच्या



राजकीय सोयीचा आहे, यापेक्षा तो पुराव्यांवर आधारित आहे का, हे महत्त्वाचे आहे.

या वादाचा सामाजिक पैलूही दुर्लक्षित करता येणार नाही. मनोज जरांगे हे मराठा आरक्षण आंदोलनाशी संबंधित महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व असल्याने त्यांच्या नावाभोवती निर्माण झालेल्या वादाचे पडसाद व्यापक स्तरावर उमटू शकतात. त्यामुळे राजकीय नेत्यांनी जबाबदारीने विधाने करणे आवश्यक आहे. समाजात गैरसमज पसरवणारी विधाने, पुराव्यांशिवाय केलेले गंभीर आरोप आणि वैयक्तिक पातळीवरील टीका यामुळे मूळ प्रश्नाचे गांभीर्य कमी होऊ शकते. लोकशाहीत कोणालाही प्रश्न विचारण्यापासून रोखता येत नाही; परंतु प्रश्नांची उत्तरे देताना तथ्यांपासून पळ काढण्याची मुभाही कोणाला असू नये.

महाराष्ट्राच्या जनतेने यापूर्वी अनेक राजकीय वाद पाहिले आहेत. आरोप झाले, प्रत्यारोप झाले, पत्रकार परिषदा झाल्या आणि काही काळाने नव्या विषयाने जुन्या वादाची जागा घेतली. मात्र, गंभीर आरोपांच्या बाबतीत असे होणे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही. एखाद्या प्रकरणाची चर्चा काही दिवस रंगली आणि त्यानंतर ते विस्मरणात गेले, तर सत्य शोधण्याची प्रक्रिया अपूर्णच राहते. ५०० कोटींच्या कथित ऑडिओ क्लिपच्या बाबतीत असे घडू नये. या प्रकरणात जे काही सत्य असेल, ते पुराव्यांसह जनतेसमोर आले पाहिजे. कोण दोषी आहे किंवा कोण निर्दोष आहे, याचा निर्णय राजकीय व्यासपीठावर नव्हे, तर उपलब्ध पुरावे आणि कायदेशीर प्रक्रियेच्या आधारे झाला पाहिजे.

महाराष्ट्राला आरोपांचा धुरळा नको, तर सत्याचा निकाल हवा आहे! एसआयटीची घोषणा झाली, फॉरेन्सिक तपासणीचा मुद्दा पुढे आला; आता या प्रक्रियेचा निष्कर्ष काय लागतो, याकडे जनतेचे लक्ष असेल. ५०० कोटींच्या कथित ऑडिओ बॉम्बचा आवाज राजकीय सभांमध्ये कितीही घुमला, तरी त्याचे सत्य तपासाच्या कसोटीवरच ठरणार आहे. आरोप करणाऱ्यांनी पुरावे द्यावेत, आरोपांचे खंडन करणाऱ्यांनी प्रश्नांची उत्तरे द्यावीत आणि तपास यंत्रणांनी निष्पक्षपणे सत्य समोर आणावे. कारण लोकशाहीत अंतिम अधिकार कोणत्याही पक्षाचा, नेत्याचा किंवा प्रवक्त्याचा नसतो; तो जागरूक जनतेचा असतो. राजकारणाच्या धुरळ्यात सत्य गाडले जाऊ नये आणि सत्तेच्या सावलीत चौकशीचा आवाज दबला जाऊ नये, एवढीच अपेक्षा

## दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना दिलासा; २६ विद्यापीठांत 'झिरो चलन' सुविधा लागू

**मुंबई प्रतिनिधी**

**मुंबई:** राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांतील विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने परीक्षा शुल्कमाफीचा निर्णय घेतला आहे. या सुविधेअंतर्गत राज्यातील २६ विद्यापीठांमधील २ लाख ४० हजार ३६५ विद्यार्थ्यांनी एकही रुपया परीक्षा शुल्क न भरता 'झिरो चलन' सुविधेद्वारे परीक्षा अर्ज दाखल केले आहेत, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ वरून ३०५ झाली असून, या भागांतील पात्र विद्यार्थ्यांना शुल्कमाफीचा लाभ दिला जात आहे. परीक्षा अर्ज भरताना शुल्क भरण्याची गरज पडू नये, यासाठी विद्यापीठांच्या अर्ज प्रक्रियेत 'झिरो चलन' पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. यासंदर्भात सर्व विद्यापीठांनी आवश्यक परिपत्रके जारी केली आहेत.

आधी परीक्षा शुल्क भरलेल्या पात्र विद्यार्थ्यांनाही रक्कम परत मिळणार आहे. त्यासाठी परतावा प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, अंमलबजावणीसाठी उच्च शिक्षण संचालनालय, विद्यापीठे आणि परीक्षा विभागामध्ये समन्वय यंत्रणा कार्यरत करण्यात आली आहे.

परीक्षा अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३० ऑक्टोबर असून, या सवलतीचा लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाच लाखांवर जाण्याचा अंदाज उच्च शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे. शुल्कमाफीचा लाभ घेताना अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी संबंधित विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळ, जनसंपर्क अधिकारी किंवा विद्यार्थी विकास विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागाने केले आहे.



## दुष्काळ, कर्जबाजारीपणाने ७५ वर्षीय शेतकऱ्याची आत्महत्या

**चंद्रपूर प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यातील चिचबोडी येथील श्रीरंग केशव ठावरी (वय ७५) यांनी आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केली. यंदाच्या दुष्काळामुळे पिकांचे नुकसान झाल्याने कर्जाची परतफेड कशी करायची आणि दिवाळीचा सण कसा साजरा करायचा, या चिंतेत ते होते.

शुक्रवारी रात्री ते शेतात गेले होते. शनिवारी, २४ ऑक्टोबर रोजी सकाळी त्यांचा मृतदेह शेतातील शेवग्याच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळला. घटनेची माहिती मिळताच विरूर स्टेशन पोलिसांनी घटनास्थळी जाऊन नोंद घेतली असून, पुढील तपास सुरू केला आहे.

ठावरी यांच्याकडे शेती होती. मात्र, सातत्याने होणारी नापिकी आणि यंदाच्या दुष्काळी परिस्थितीमुळे त्यांच्यावरील कर्जाचा भार वाढला होता. मोठा खर्च करून पेरणी केल्यानंतरही अपेक्षित उत्पन्न मिळण्याची आशा मावळली. हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने कर्जाची परतफेड कशी करायची, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता. गेल्या काही दिवसांपासून ते अस्वस्थ असल्याचे सांगण्यात येते. दिवाळीचा सण जवळ आला असताना आर्थिक अडचणींमुळे त्यांची चिंता वाढली होती. शासनाकडून जाहीर झालेल्या पाच हजार रुपयांच्या मदतीतून कर्जाचे संकट आणि सणाचा खर्च कसा भागवायचा, याची विवंचना त्यांना सतावत होती. या घटनेमुळे शेतीतील संकटांचे वास्तव पुन्हा समोर आले असून, चिचबोडी गावात हळहळ व्यक्त होत आहे.



## भाजपमध्ये येण्यासाठी अनेकदा ऑफर; सुशीलकुमार शिंदेंचा दावा

**सोलापूर प्रतिनिधी**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश करण्यासाठी आपल्याला अनेकदा निमंत्रण देण्यात आल्याचा दावा केला आहे. मात्र, आपण या ऑफर नाकारल्याचे सांगत, सध्या ज्या पक्षात आहोत, तिथेच काम करत राहण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

शिंदे यांचा नातू शिखर पहारिया याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त बॅनर लावून शुभेच्छा दिल्याने निर्माण झालेल्या वादावर उत्तर देताना त्यांनी हे वक्तव्य केले. पंतप्रधानांना शुभेच्छा देण्यात किंवा त्यांची भेट घेण्यात काहीही गैर नसल्याचे शिंदे म्हणाले. मात्र, राजकारणात कोणती विचारधारा आणि तत्त्वे पाळली जातात, हे अधिक महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

"मलाही भाजपमध्ये सामील होण्यासाठी अनेकदा सांगण्यात आले. मात्र, तिथे जाऊन मी काय साध्य करणार, असा प्रश्न मी त्यांना विचारला. मी जिथे आहे, तिथेच माझे काम करत राहीन," असे शिंदे यांनी सांगितले. अलीकडच्या काळात भाजपमध्ये प्रवेश केलेल्या नेत्यांची अवस्था कशी होते, हे आपण पाहिल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, शिंदे यांच्या वक्तव्यावर काँग्रेसचे सहकारी पृथ्वीराज चव्हाण यांनी प्रतिक्रिया दिली. राजकीय पक्षांकडून इतरांना आपल्या पक्षात येण्याची निमंत्रणे कधी अनौपचारिकपणे, तर कधी वरिष्ठ पातळीवरून संदेश देऊन दिली जातात, असे ते म्हणाले. भाजपला राजकीय संघटना म्हणून आपला पाया विस्तारण्याचा अधिकार असल्याचे सांगतानाच, शिंदे यांना अशी ऑफर आली असली तरी त्यांनी ती स्वीकारलेली नाही, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.



## संजय गांधी उद्यानातील शिकारीचे गूढ गडद; दोन छर्रे, जळालेला मोबाईल जप्त

**मुंबई प्रतिनिधी**

**मुंबई:** संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील शिकारीदरम्यान झालेल्या गोळीबारात विजय सापटे यांच्या मृत्यूचे गूढ उकलण्यासाठी पोलिसांनी तपासाला वेग दिला आहे. घटनास्थळावरून दोन छर्रे आणि अर्धवट जळालेला मोबाईल जप्त करण्यात आला असून, स्मशानभूमीतील राखेतूनही महत्त्वाचे पुरावे मिळण्याची शक्यता आहे.

१९ ऑक्टोबरच्या रात्री साडेनऊच्या सुमारास सातजणांची टोळी शिकारीसाठी गेली होती. डोंगरावरून उतरताना मोबाईलचा प्रकाश वन्यप्राण्याचे डोळे असल्याचा समज झाल्याने महेश गायकर याने गोळीबार केल्याचा आरोप आहे. या गोळीबारात विजय सापटे यांच्या छातीला व पायाला छरे लागल्याने त्यांचा मृत्यू झाला, तर कल्पेश डगला आणि कुणाल शेलार जखमी झाले.

मृत्यूची माहिती पोलिसांना न देता विजय यांच्यावर चेना गावातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आल्याचा आरोप आहे. तपासात रक्ताचे डाग असलेली पाने, दगड, चप्पल, रायफलचा भाग आणि छऱ्यांची बंदूकही जप्त करण्यात आली.

या प्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. महेश गायकर आणि काठोड लाबड यांना अटक करण्यात आली असून, २४ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. डॉ. राजेश पालांडे यांनाही नोटीस देण्यात आली आहे.



सातारा प्रतिनिधी
www.satarapratinidhi.com

# मद्यधुंद चालकामुळे २० प्रवाशांचा जीव धोक्यात

■ पालघर प्रतिनिधी

बोईसर आगारातून कोल्हापूर-ज्योतिबाच्या दिशेने निघालेल्या एसटी बसचा चालक मद्यप्राशन केलेल्या अवस्थेत आढळल्याने खळबळ उडाली. सोमवारी रात्री आठ वाजता रवाना झालेली बस (क्र. एमएच १४ एमएच ०६५३) रात्री साडेआठच्या सुमारास पालघर येथील मनोरकडे जाणाऱ्या चाररस्त्यावर वाहतूक पोलिसांनी तपासणीसाठी थांबवली. या बसमधून सुमारे २० प्रवासी प्रवास करत होते.
पालघर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल व्हटकर आणि त्यांच्या पथकाने अल्कोहोल तपासणी यंत्राद्वारे चालक महेश अशोक सरोदे यांची तपासणी केली. त्यात त्यांनी मद्यप्राशन केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून बोईसर आगार प्रशासनाला माहिती दिली. दुसऱ्या चालकाची व्यवस्था केल्यानंतर बस पुढील प्रवासासाठी रवाना करण्यात आली.
बोईसर आगार व्यवस्थापक प्रसाद जाधव यांनी संबंधित चालकाची कामगिरी सध्या बंद केल्याचे सांगितले. पालघर येथून अहवाल प्राप्त झाल्यानंतर निष्कर्षांनुसार पुढील कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे बस मार्गस्थ होण्यापूर्वी चालकांची मद्यप्राशन तपासणी होते का, असा प्रश्न उपस्थित झाला असून प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी नियमित तपासणीची मागणी होत आहे.




## डॉक्टरांना महागड्या भेटवस्तू देणाऱ्या औषध कंपन्यांवर सरकारची नजर; उच्चस्तरीय समिती स्थापन

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था

**नवी दिल्ली:** औषध कंपन्यांकडून डॉक्टरांना भेटवस्तू किंवा आर्थिक प्रलोभने देऊन प्रभावित करण्याच्या प्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. औषध विपणन संहितेचा (UCPMP) आढावा घेण्यासाठी सरकारने तीन सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे.
औषध कंपन्यांकडून डॉक्टरांना महागड्या भेटवस्तू दिल्यास संबंधित कंपन्यांची औषधे लिहून देण्याची शक्यता वाढते. त्यामुळे रुग्णांना गरजेपेक्षा महागडी औषधे दिली जाण्याचीही शक्यता असते. या पार्श्वभूमीवर औषध कंपन्यांच्या विपणन पद्धतींवर नियंत्रण ठेवणाऱ्या सध्याच्या नियमांची तपासणी केली जाणार आहे.
नीती आयोगाचे सदस्य डॉ. एम. श्रीनिवास यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करण्यात आली आहे. माजी केंद्रीय आरोग्य सचिव प्रीती सुदान आणि डॉ. नरेश त्रेहान हे समितीचे अन्य दोन सदस्य आहेत. २२ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या आदेशानुसार समितीची स्थापना करण्यात आली.
औषध कंपन्यांच्या बेकायदेशीर मार्केटिंग पद्धतींना आळा घालणे आणि देखरेख यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक शिफारसी करणे, ही समितीची प्रमुख जबाबदारी असेल. या निर्णयामुळे डॉक्टरांना दिल्या जाणाऱ्या भेटवस्तूंचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.



## नशामुक्त भारताचा संदेश देणाऱ्या मोटारसायकल रॅलीला राज्यपालांच्या हस्ते हिरवा झेंडा

■ स्वप्नील गाडे, मुंबई

मुंबई: राष्ट्रीय एकता दिवस २०२६ च्या अनुषंगाने 'नशामुक्त भारत' संकल्पनेवर आधारित जनजागृतीपर मोटारसायकल रॅलीचा शुभारंभ शनिवारी सकाळी १० वाजता नरिमन पॉईंट येथील हॉटेल ट्रायडंटसमोर, मरीन ड्राईव्ह येथे महाराष्ट्राच्या राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.
भारताचे पहिले उपपंतप्रधान आणि तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा केला जातो.
राज्यपालांनी भाषणातून राष्ट्रीय एकात्मता आणि अंमली पदार्थमुक्त भारताचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच महाराष्ट्र पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचे व कर्तव्यनिष्ठेचे कौतुक केले. त्यानंतर हिरवा झेंडा दाखवून रॅलीला रवाना करण्यात आले.
महाराष्ट्रासह ११ राज्यांतील सुमारे १३३ पोलीस अधिकारी व अंमलदार या रॅलीत सहभागी झाले. मुंबईतील विविध शाळा-महाविद्यालयांतील ५०० हून अधिक विद्यार्थी व तरुणांनीही सहभाग नोंदविला. ही रॅली गुजरातमधील एकतानगर, केवडिया येथे पोहोचून ३१ ऑक्टोबर रोजी राष्ट्रीय एकता दिवसाच्या कार्यक्रमात सहभागी होणार आहे.
या कार्यक्रमाला महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष मिलिंद नार्वेकर, सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितु तावडे, पोलीस महासंचालक सदानंद दाते, मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती, अपर पोलीस महासंचालक राजकुमार व्हटकर




यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

## तुकाराम मुंढेंच्या FDA ची केंद्राविरोधात हायकोर्टात धाव; अधिकार हिरावल्याचा गंभीर आरोप

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था

**मुंबई:** महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाने (FDA) केंद्रीय आरोग्य मंत्रालय आणि भारतीय अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरणाविरोधात (FSSAI) मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. अन्न सुरक्षा आणि मानके कायदा २००६ अंतर्गत राज्याला मिळालेल्या अधिकारांच्या वापरात अडथळे आणले जात असून, कारवाई करण्यापासून रोखले जात असल्याचा आरोप FDA ने केला आहे.
FSSAI ने स्वतंत्र आणि समांतर अंमलबजावणी यंत्रणा उभी केल्याचा दावा करत, केंद्रीय अन्न सुरक्षा अधिकारी आणि केंद्रीय परवाना प्राधिकरण यांसारखी पदे निर्माण करण्याच्या अधिकारावरही FDA ने प्रश्न उपस्थित केले आहेत. ही पदे कायद्यातील वैधानिक चौकटीत बसत नसल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.
तुकाराम मुंढे यांनी FDA आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर राज्यात अन्न सुरक्षा नियमांच्या अंमलबजावणीसाठी तपासण्या, छापे आणि परवाने निलंबित करण्याच्या कारवाया सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर दाखल झालेल्या याचिकेमुळे राज्य आणि केंद्राच्या अन्न सुरक्षा यंत्रणांमधील अधिकारांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालय काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.



## मुंबईतील प्रदूषणावर महापौर आक्रमक; आरएमसी प्लांट शहराबाहेर हलवण्याचे आदेश

■ मुंबई प्रतिनिधी

मुंबईतील प्रदूषणाच्या मुद्द्यावर शुक्रवारी महापालिकेच्या महासभेत चार तासांहून अधिक काळ चर्चा झाली. प्रदूषण कमी करण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करावा आणि विकासकांचे सर्व सिमेंट-काँक्रीटचे रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) प्लांट शहराबाहेर हलवावेत, असे आदेश महापौर रितू तावडे यांनी प्रशासनाला दिले.
मुंबई हे जगातील चौथ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर असल्याचा दावा चुकीचा असून, त्यामुळे शहराची बदनामी होत असल्याचे अतिरिक्त आयुक्त अविनाश ढाकणे यांनी सांगितले. मात्र, प्रशासनाच्या उपाययोजनांवर नगरसेवकांनी असमाधान व्यक्त केले. विरोधी पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी ऑक्टोबर ते फेब्रुवारीदरम्यान बांधकामांवर निर्बंध आणण्याची सूचना केली.
महापौरांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्याकडे आलेल्या आठ हजार पत्रांपैकी सुमारे ७,५०० पत्रे अनधिकृत बांधकामे आणि धुळीच्या प्रदूषणाशी संबंधित आहेत. शहरात सुमारे ३,५०० बांधकामे सुरू असून, बांधकामस्थळी लावल्या जाणाऱ्या हवा गुणवत्ता फलकांवर चुकीची माहिती दिली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.
मनसेचे यशवंत किल्लेदार यांनी दादर-माहीममधील जवळपास १०० बांधकामांमुळे धुळीचे प्रदूषण वाढत असल्याचे सांगितले.
काँग्रेसचे अश्रफ आझमी यांनी वृक्षतोडीचा मुद्दा उपस्थित केला, तर भाजपचे गणेश खणकर यांनी पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याने रस्ते धुण्याची सूचना केली.




# दिवाळीत फटाके फोडताना सावधान! नियम मोडल्यास कारवाई

■ मुंबई प्रतिनिधी

मुंबई : दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाके फोडणे आणि विक्रीसंदर्भात पोलिस प्रशासनाने नियमावली जाहीर केली आहे. रस्ते, पदपथ, गल्ल्या आणि संवेदनशील ठिकाणांच्या परिसरात फटाके फोडण्यावर निर्बंध असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई होऊ शकते.
नियमांनुसार, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, सरकारी कार्यालये आणि न्यायालयांपासून १०० मीटरच्या परिसरात फटाके फोडण्यावर निर्बंध आहेत. रात्री १० ते सकाळी ६ या वेळेत आवाज करणारे फटाके फोडण्यास बंदी आहे. फटाक्यांच्या आवाजावरही मर्यादा असून, चार मीटर अंतरावर १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणाऱ्या फटाक्यांचे उत्पादन, विक्री आणि वापर प्रतिबंधित आहे. १०० पेक्षा अधिक फटाके असलेल्या साखळी बॉम्बवरही बंदी आहे.
तात्पुरत्या फटाके विक्रीचे परवाने ६ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२६ या कालावधीसाठी दिले जाणार आहेत. परवान्याची मुदत संपल्यानंतर विक्री करता येणार नाही. शिल्लक साठा अधिकृत गोदामात किंवा घाऊक परवानाधारकाकडे जमा करणे बंधनकारक असेल. विक्री स्टॉलपासून ५० मीटरच्या परिसरात आतषबाजी करण्यास तसेच विदेशी बनावटीच्या फटाक्यांच्या विक्रीवर निर्बंध आहेत.
दरम्यान, ग्रीन फटाक्यांमध्येही विषारी जड धातू असल्याचा दावा करत आवाज फाउंडेशनने सर्व प्रकारच्या फटाक्यांवर बंदीची मागणी केली आहे. न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करण्यात अपयश आल्याबद्दल हायकोर्टाने प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. या प्रकरणी २६ ऑक्टोबर रोजी मुंबई महापालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) आणि पोलीस प्रमुखांना न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



# ठाण्यातील डेटा सेंटरला स्थगिती द्या, कर्जतमधील वृक्षतोडवरही आदित्य ठाकरेंचा संतप्त सवाल

■ मुंबई प्रतिनिधी

मुंबई : ठाण्यातील बाळकूम-माजिवडा परिसरात प्रस्तावित अॅमेझॉन एआय डेटा सेंटर प्रकल्पाला तज्ज्ञ समितीचा अहवाल येईपर्यंत स्थगिती द्यावी, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. पाणीपुरवठा, वीज वितरण आणि पर्यावरणावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचा सखोल अभ्यास करण्याची मागणी त्यांनी केली.
या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी आणि वीज लागण्याची शक्यता असून, डिझेल जनरेटरचे उत्सर्जन, ध्वनिप्रदूषण आणि उष्णतेच्या परिणामांचाही अभ्यास आवश्यक असल्याचे ठाकरे यांनी म्हटले. डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने तीन महिन्यांत अहवाल देणे अपेक्षित आहे. तोपर्यंत प्रकल्पाचे काम थांबवावे, तसेच स्थानिक संस्थांच्या प्रतिनिधींनाही समितीत स्थान द्यावे, अशी मागणी त्यांनी केली. प्रकल्प औद्योगिक क्षेत्रात हलवता येणार नाही का, असा सवाल करत त्यांनी बिल्डरांच्या हितासाठी नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप केला.
दरम्यान, कर्जत तालुक्यातील सायडोंगर परिसरात टोरंट पॉवरच्या जलविद्युत प्रकल्पासाठी हजारो झाडांची कथित वृक्षतोड सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. नोव्हेंबरमधील भूमिपूजनासाठी पर्यावरणाचा बळी का दिला जात आहे आणि वन विभागाने कोणाच्या दबावाखाली परवानगी दिली, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दुष्काळी परिस्थिती असताना जंगलतोड करून पर्यावरणाचा समतोल बिघडवू नये, तसेच दोन्ही प्रकरणांत सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी ठाकरे यांनी केली.




# मुंबईत दूध डेअरींवर FDAचे छापे; ५६४ लिटर संशयित दूध नष्ट

■ मुंबई प्रतिनिधी

मुंबईतील भेसळयुक्त दुधाच्या विक्रीला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (FDA) आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या देखरेखीखाली विशेष तपासणी मोहीम राबवली. या कारवाईत गोवंडी, मानखुर्द, चेंबूर आणि धारावी येथील दूध संकलन व विक्री केंद्रांची अचानक तपासणी करण्यात आली. यावेळी ५६४ लिटर संशयित आणि असुरक्षित दूध जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आले.
तपासणीदरम्यान काही केंद्रांमध्ये दुधाची साठवणूक आणि हाताळणी अस्वच्छ वातावरणात होत असल्याचे निदर्शनास आले.
संशयास्पद दुधाचे नमुने प्रयोगशाळेतील तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. दुधात पाणी किंवा हानिकारक रसायनांची भेसळ करून विक्री केल्याप्रकरणी संबंधित व्यावसायिकांचे परवाने निलंबित करण्याची प्रशासकीय प्रक्रिया सुरू असून, दोषींवर अन्न सुरक्षा कायद्यानुसार कारवाई करण्याची तयारी आहे.
अन्नपदार्थ, औषधे आणि दुग्धजन्य पदार्थांमधील भेसळ खपवून घेतली जाणार नसल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. नागरिकांनी खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेबाबत संशय आल्यास प्रशासनाकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. मुंबईसह राज्यभरात अशा तपासणी मोहिमा सुरू राहणार आहेत.



## नमनसोबत खेळताना 'धीर' धरला! हैदराबादकर मित्राच्या साथीनं न्यूझीलंडचा प्लॅन उधळला; तिलक काय म्हणाला?

■ क्रीडा प्रतिनिधी

न्यूझीलंडविरुद्ध क्राइस्टचर्च येथे झालेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यात भारतीय संघाचा उपकर्णधार तिलक वर्माने नाबाद ५१ धावांची खेळी करत भारताच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. डावखुऱ्या तिलकने अवघ्या २६ चेंडूंत अर्धशतक झळकावले.
भारताची अवस्था ५ बाद ७० अशी असताना त्याने नमन धीरसोबत संयमी फलंदाजी करत डाव सावरला. त्यानंतर हैदराबादचा सहकारी नितीश कुमार रेड्डीसोबत आक्रमक खेळ करत भारताला विजय मिळवून दिला.
सामनावीर ठरलेल्या तिलकने सांगितले की, सामन्यापूर्वी गौतम सर आणि कोटक सर यांनी अखेरपर्यंत फलंदाजी केल्यास सामना जिंकता येईल, असा सल्ला दिला होता. नमन धीरसोबत सहाव्या विकेटसाठी २४ चेंडूंत ४२ धावांची भागीदारी झाली. सँटनरच्या षटकात धीर बाद झाला नसता, तर सामना १८ व्या षटकातच संपवता आला असता, असे तिलकने नमूद केले. नितीशसोबत चेंडू टप्प्यात मिळाल्यास आक्रमण करणे आणि अन्यथा गॅपमध्ये चेंडू ढकलून धावा पळणे, ही रणनीती यशस्वी ठरल्याचेही त्याने सांगितले.




# दिवाळीपूर्वीच एसटी कर्मचाऱ्यांच्या खात्यात पगार आणि बोनस!

■ मुंबई प्रतिनिधी

**मुंबई:** दिवाळीपूर्वीच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) सुमारे ८३ हजार अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पगार व दिवाळी बोनस मिळण्याची शक्यता आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिवाळीपूर्वी बोनस आणि नोव्हेंबर महिन्याचे वेतन वितरित करण्यासाठी प्रशासनाला आवश्यक निर्देश दिले आहेत.
सामान्यतः एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन दर महिन्याच्या ७ ते १० तारखेदरम्यान केले जाते. मात्र, यंदा ६ नोव्हेंबरपासून दिवाळी सणाला सुरुवात होत असल्याने कर्मचाऱ्यांना वेळेत पैसे मिळावेत, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. दिवाळीची खरेदी, घरगुती खर्च आणि सणाचे नियोजन करता यावे, हा त्यामागील उद्देश आहे.
वेतनासाठी आवश्यक अनुदान तसेच प्रवासी सवलत योजनांच्या प्रतिपूर्तीपोटी शासनाकडे प्रलंबित असलेली रक्कम मिळवण्यासाठी अर्थ-नियोजन विभागाने तातडीने पाठपुरावा करावा, असे निर्देशही सरनाईक यांनी दिले आहेत.
कर्मचाऱ्यांच्या दिवाळीच्या आनंदात आर्थिक अडचणींमुळे अडथळा येऊ नये, यासाठी प्रशासनाने वेतन वितरणाच्या प्रक्रियेला प्राधान्य दिले आहे.




# मुंबई विद्यापीठाकडून बौद्ध भन्ते राजेश बलखंडे यांचा पदव्युत्तर प्रवेश रद्द

■ मुंबई प्रतिनिधी

मुंवई : मुंबई विद्यापीठाने कलिना परिसरात विविध मागण्यांसाठी आठ महिन्यांहून अधिक काळ आंदोलन करणारे बौद्ध भन्ते राजेश बलखंडे ऊर्फ भदंत विमंस यांचा २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा प्रवेश रद्द केला आहे. आंबेडकर अभ्यास या अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षासाठी त्यांनी प्रवेश घेतला होता. १३ ऑक्टोबर रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, १५ ऑक्टोबरला त्यांना कळविण्यात आला.
या निर्णयावर आक्षेप घेत भन्ते बलखंडे यांनी उच्च न्यायालयाच्या आदेशात नवीन अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यास किंवा विद्यापीठ परिसरात येण्यास बंदी नसल्याचा दावा केला. प्रवेश रद्द करून शिक्षणाच्या अधिकारावर गदा आणल्याचा आरोप करत त्यांनी कुलगुरूंकडे स्पष्टीकरण मागितले आहे.
विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार आठ वर्षांत पीएचडी पूर्ण न केल्यामुळे नोंदणी रद्द झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये बलखंडे यांचाही समावेश होता. याविरोधात त्यांनी आंदोलन केले होते. एप्रिलमध्ये उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर त्यांनी आंदोलन मागे घेतले. विद्यापीठाने न्यायालयाचा आदेश आणि व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयाच्या आधारे कारवाई केल्याचे स्पष्ट केले आहे. दरम्यान, २००५ पासून विद्यापीठाशी संबंधित असलेल्या बलखंडे यांच्या आंदोलनांमुळे शैक्षणिक वातावरणावर परिणाम झाल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. तसेच २० मेच्या व्यवस्थापन परिषदेत बलखंडे, तुषार मिश्रा आणि शशिकांत जगताप यांच्या वर्तनासंदर्भात नोटीस बजावण्याचा निर्णय घेण्यात आला होता.



# कर्करोगाच्या औषधांच्या किमती ७० टक्क्यांपर्यंत घटण्याची शक्यता; केंद्राचा प्रस्ताव

■ नवी दिल्ली, वृत्तसंस्था

**नवी दिल्ली:** कर्करोगावरील औषधे रुग्णांना परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकारने औषधांच्या विक्रीवरील व्यापारी नफा कमाल किरकोळ किमतीच्या (एमआरपी) ३० टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याचा प्रस्ताव मांडला आहे. यामुळे निवडक औषधांच्या किमती २० ते ७० टक्क्यांपर्यंत कमी होण्याची आणि रुग्णांची दरवर्षी सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची बचत होण्याची अपेक्षा आहे.
या प्रस्तावाबाबत केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून माहिती दिली आहे. औषध उत्पादक, वितरक आणि किरकोळ विक्रेते यांच्या स्तरावर आकारल्या जाणाऱ्या व्यापारी नफ्यावर मर्यादा आणून औषधांच्या किमतीतील अवाजवी वाढ रोखण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.
प्रस्तावित व्यवस्थेत १३७ बिगर-अनुसूचित कर्करोगविरोधी औषधांचा समावेश असून, त्यात पेटंट असलेल्या औषधांचाही समावेश आहे. इम्युनोथेरपी, टार्गेटेड थेरपी तसेच स्तन, प्रोस्टेट आणि कोलन कर्करोगावरील औषधांचा त्यात समावेश होण्याची शक्यता आहे. ही दरव्यवस्था ९ नोव्हेंबर २०२६ पासून लागू होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मात्र, या व्यवस्थेची अंतिम अंमलबजावणी, त्यात समाविष्ट होणारी औषधे आणि लागू होण्याची निश्चित तारीख याबाबत अंतिम निर्णय होणे बाकी आहे.



सातारा प्रतिनिधी
www.sataraprati nidhi.com

## विट्यात यंत्रमाग कामगाराचा खून; ४८ तासांत आरोपीला अटक

विटा प्रतिनिधी

विटा : शहरातील दत्तनगर परिसरात जुन्या भांडणाच्या रागातून इम्तियाज शमशुद्दीन अन्सारी (वय ४२) या यंत्रमाग कामगाराच्या डोक्यात फरशीचे घाव घालून खून करण्यात आला. या प्रकरणातील संशयित विजय शंकर चव्हाण (वय ३१, रा. मेटकरी वस्ती, विटा) याला विटा पोलिसांनी घटनेनंतर ४८ तासांच्या आत अटक केली.
इम्तियाज अन्सारी हे मूळचे चंदूर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील असून सध्या दत्तनगर, विटा येथे राहत होते. ते आणि संशयित विजय चव्हाण हे दोघेही विटा येथील पॉवरलूम कारखान्यात कामाला होते. कारखान्याचे मालक सचिन नंदकुमार भागवत यांच्या मालकीच्या खोलीत इम्तियाज राहत होते. १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहा वाजण्यापूर्वी जुन्या वादातून विजय चव्हाण याने इम्तियाज यांच्या डोक्यात फरशीचे घाव घातले. या हल्ल्यात त्यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी सचिन नंदकुमार भागवत (वय ३५, रा. आदर्शनगर, लेंगरे रोड, विटा) यांनी विटा पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.
दरम्यान, पोलिस हवालदार अमोल पाटील आणि पोलिस कर्मचारी महेश देशमुख यांना मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी लेंगरे रोडवरील भांबर्डे टेक परिसरात सापळा रचून संशयित विजय चव्हाण याला ताब्यात घेतले. त्याला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता, २२ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.
खुनामागील नेमके कारण आणि घटनेशी संबंधित अन्य बाबींचा तपास सुरू असून, विटा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सुरेश साळुंखे पुढील तपास करीत आहेत.



## नांदेडमध्ये खळबळ! कर्जवसुलीसाठी नेलेल्या शेतकऱ्याचा मृत्यू

नांदेड प्रतिनिधी

नांदेड शहरातील हिंगोली गेट ते चिखलवाडी बायपास रोड परिसरातील खासगी फायनान्स कंपनीच्या कार्यालयात चंद्रकांत शिंदे (वय ४०, रा. माळकौठा, ता. मुदखेड) या अल्पभूधारक शेतकऱ्याचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. दोन दिवसांपूर्वी कर्जाचे हप्ते थकल्याने कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी त्यांना गावातून कार्यालयात आणले होते, असा आरोप त्यांच्या कुटुंबीयांनी केला आहे. कर्जवसुलीसाठी त्यांच्यावर मानसिक दबाव टाकण्यात आल्याचाही आरोप करण्यात आला आहे.
या घटनेमुळे नांदेड जिल्ह्यात खळबळ उडाली असून, शिंदे यांच्या मृत्यूमागील परिस्थितीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला आहे. मृत्यूचे नेमके कारण आणि कर्जवसुलीसाठी कार्यालयात आणल्यानंतर घडलेल्या घटनाक्रमाचा पोलीस तपास करत आहेत. कुटुंबीयांनी केलेल्या आरोपांची



पडताळणी होणे बाकी असून, संबंधितांवरील जबाबदारी तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

## ऑनलाइन सट्टा रॅकेटचा पर्दाफाश; १० जणांना अटक

स्वप्नील गाडे, गुन्हे वार्ताहर

**मुंबई**: भिवंडी पोलिसांनी मुंबईतील गोरेगाव येथील एका अपार्टमेंटवर छापा टाकून ऑनलाइन सट्टा लावणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. या कारवाईत १० जणांना अटक करण्यात आली. ही कारवाई परिमंडळ-२ चे पोलीस उपायुक्त डॉ. पवन बनसोड यांच्या देखरेखीखाली करण्यात आली.
पोलिसांनी छाप्यात ३२ मोबाईल फोन, ४९ एटीएम कार्ड, ४० सिम कार्ड, चार लॅपटॉप आणि इतर साहित्य जप्त केले.
प्राथमिक माहितीनुसार, खिलाडी आणि अण्णा या ॲपच्या माध्यमातून शेअर बाजारातील किमती, सोन्याचे दर, क्रिकेट सामने आणि इतर घटनांवर पैसे लावण्यास लोकांना प्रवृत्त केले जात असल्याचा आरोप आहे. हे ॲप महादेव बेटिंग ॲपप्रमाणे चालवले जात असल्याचे सांगण्यात येत आहे.
या टोळीचे जाळे अनेक राज्यांत पसरले असण्याचा पोलिसांना संशय आहे. या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे आणि हे रॅकेट किती मोठे आहे, याचा तपास पोलीस करत आहेत.




## रस्त्याअभावी हाल, पैशांअभावी उपचार नाही; बाळानंतर मातेचाही मृत्यू

गडचिरोली प्रतिनिधी

गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यातील चोखेवाडा ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या अतिदुर्गम रेखानार गावात प्रसूतीनंतर नवजात बाळाचा मृत्यू झाला. त्यानंतर उपचारांसाठी पैसे नसल्याने अत्यवस्थ मातेचाही मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना २३ व २४ ऑक्टोबरदरम्यान घडली. पार्वती सुरेश झोरे (२१) असे मृत मातेचे नाव आहे.
रेखानार ते चोखेवाडा या १५ किलोमीटर अंतरात रस्ता नसल्याने प्रसूतीच्या काळात पार्वती यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. त्यामुळे त्यांना आधीच माहेरच्या पैंडी गावात हलवण्यात आले होते. २९ सप्टेंबरला प्रसूतीवेदना सुरू झाल्यानंतर त्यांना गडचिरोलीच्या महिला रुग्णालयात दाखल करण्यात




आले. प्रकृती गंभीर झाल्याने चंद्रपूरला हलवण्यात आले. ३० सप्टेंबरला शस्त्रक्रियेद्वारे मुलाचा जन्म झाला. मात्र, बाळाचे वजन अवघे ६०० ग्रॅम होते. तीन दिवसांच्या उपचारानंतर त्याचा मृत्यू झाला.
पार्वती यांची प्रकृती सुधारत नसल्याने त्यांना नागपूरला नेण्यात आले. तेथील शासकीय डॉक्टरांनी खासगी रुग्णालयात उपचार घेण्याचा सल्ला दिला; मात्र आर्थिक परिस्थितीमुळे उपचार शक्य झाले नाहीत. अखेर त्यांना पैंडी येथे परत आणण्यात आले. २३ ऑक्टोबरला प्रकृती खालावल्याने कसनसूर प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तेथून गडचिरोलीला जाण्याचा सल्ला मिळाला. मात्र, आर्थिक अडचणींमुळे कुटुंबीयांनी त्यांना हेडरी येथील रुग्णालयात दाखल केले. तेथूनही गडचिरोलीला जाण्यास सांगण्यात आले; परंतु नातेवाइकांना माघार घ्यावी लागली. २४ ऑक्टोबरला पार्वती यांचा मृत्यू झाला. एटापल्ली ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले.
या घटनेमुळे दुर्गम भागातील रस्ते आणि आरोग्यसेवेच्या सुविधांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून प्रशासन जबाबदारी निश्चित करणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

## माहीममध्ये रॅपिडो रायडरला अटक; एटीएसकडून प्रकरणाचा तपास सुरू

मुंबई प्रतिनिधी

**मुंबई**: महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) बंदी घातलेल्या जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी कथित संबंध असल्याच्या आरोपावरून ३३ वर्षीय मोहम्मद हसन अबू सरमद अख्तर याला अटक केली. गुप्त माहितीच्या आधारे माहीम मेट्रो स्टेशनजवळ ही कारवाई करण्यात आली. प्राथमिक तपासानुसार, आरोपी रॅपिडो रायडर म्हणून काम करताना आणि परफ्यूम विक्रीच्या माध्यमातून कट्टरतावादी विचारांचा प्रसार करत असल्याचा संशय आहे.
याशिवाय, एका संशयिताचा पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्याशी संपर्क असल्याचा आरोप असून, त्याला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. माहीम पोलीस ठाण्यात याप्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला असून, मोबाईल फोन




आणि लॅपटॉप जप्त करण्यात आले आहेत. या उपकरणांची तपासणी सुरू आहे.
दरम्यान, गुजरात एटीएसने जुलैमध्ये जैश-ए-मोहम्मदशी संबंधित आठ जणांना गुजरात आणि मध्य प्रदेशातून अटक केली होती. ते पाकिस्तानी सूत्रधारांच्या संपर्कात राहून संघटनेचे नेटवर्क उभारणे आणि गुजराती भाषेत विचारधारेचा प्रसार करणे, तसेच पाकिस्तानस्थित संघटनेकडून निधी मिळवणे, असे आरोप आहेत. दरम्यान, पंजाब पोलिसांनी जैशशी संबंधित टोळीचा पर्दाफाश करून जम्मू-काश्मीरमधील दोन भावांसह एका साथीदाराला अटक केली.

## मित्राच्या मृत्यूचा धक्का; साताऱ्यातील विद्यार्थिनीने वसतिगृहात संपवले जीवन

सातारा प्रतिनिधी

**सातारा**: यशोदा टेक्निकल कॅम्पसच्या वसतिगृहात पूजा माने या विद्यार्थिनीचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. ती खटाव तालुक्यातील मानेवाडी येथील रहिवासी होती. दसऱ्यानिमित्त कोल्हापूरच्या महालक्ष्मी देवीच्या दर्शनासाठी गेलेल्या तरुणांच्या वाहनाला कराडजवळ अपघात झाला होता. या दुर्घटनेत पूजाच्या जवळच्या मित्राचा मृत्यू झाल्याने तिला मानसिक धक्का बसल्याचे सांगितले जात आहे.
मंगळवारी रात्री सुमारे ११ वाजता पुणे-बंगळूर महामार्गावरील उड्डाणपुलावर स्कॉर्पिओला पाठीमागून



भरधाव ट्रकने धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, वाहनाचा चक्काचूर झाला आणि सीटवर रक्त पसरले होते. या अपघातात तेजस देशमुख (२५), सागर निंबाळकर (२३), सुयश चिंचकर (२०) आणि रोहित धोत्रे (२१) या चौघांचा मृत्यू झाला, तर ऋतुराज दुबळे (२१), शंतनू शिंगाडे (२०) आणि अमन तांबोळी (२३) हे तिघे जखमी झाले.
या दुर्घटनेत जवळच्या मित्राचा मृत्यू झाल्यानंतर पूजाच्या मनावर खोल परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर साताऱ्यातील वसतिगृहात तिने गळफास घेऊन जीवन संपवल्याचे समोर आले. मात्र, तिच्या मृत्यूमागे मित्राच्या अपघाती मृत्यूचा धक्का की अन्य काही कारण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत.
या प्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, दोन्ही घटनांचा पुढील तपास सुरू आहे.
या दुर्घटनांमुळे संबंधित कुटुंबांवर ऐन सणासुदीत दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## अहिल्यानगरमध्ये फ्लॅटमध्ये घुसून महिलेवर गोळीबार; आरोपीचाही मृत्यू

अहिल्यानगर प्रतिनिधी

अहिल्यानगर शहरातील सावेडी परिसरातील एकवीरा चौकाजवळील शिवनगर येथे शुक्रवारी एका अपार्टमेंटमध्ये घुसून योगेश सोमनाथ डोंगरे (रा. झारेकर गल्ली, नालेगाव) याने गावठी पिस्तुलातून महिलेवर गोळीबार केला. यात महिला गंभीर जखमी झाली. गोळीबारानंतर घटनास्थळावरून पळून गेलेल्या योगेशने सायंकाळी अहिल्यानगर-आगडगाव रस्त्यावरील कापूरवाडी शिवारातील घाटात मायंबा मंदिराजवळ स्वतःच्या डोक्यात गोळी झाडून घेतली. यात त्याचा मृत्यू झाला.
गोळीबारानंतर शेजाऱ्यांनी महिलेच्या कुटुंबीयांना माहिती दिली. जखमी महिलेला तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अतिरिक्त पोलिस अधीक्षक वैभव कलबुर्गे, शहर विभागाचे पोलिस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे आणि पोलिस निरीक्षक बालाजी वैद्य यांनी घटनास्थळाची पाहणी केली. न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेच्या पथकालाही पाचारण करण्यात आले.
दरम्यान, मायंबा मंदिराजवळ तरुणाने स्वतःवर गोळी झाडल्याची माहिती मिळाल्यानंतर भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याच्या सहायक पोलिस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. प्राथमिक चौकशीत मृत तरुणाची ओळख योगेश डोंगरे अशी पटली. त्याचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रात्री जिल्हा शासकीय रुग्णालयात आणण्यात आला. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.
महिलेवरील गोळीबाराचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. तोफखाना पोलिस या प्रकरणाचा तपास करत असून, प्राथमिक तपासात वेगळा पैलू समोर येत असल्याचे सांगण्यात आले. महिलेवरील गोळीबारप्रकरणी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.



## भोरमध्ये नात्याला काळिमा! दोन चुलत भावांकडून अल्पवयीन बहिणीवर अत्याचार

पुणे प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिच्याच दोन अल्पवयीन चुलत भावांनी लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या अत्याचारामुळे मुलगी गर्भवती राहिली. पुण्यातील ससून रुग्णालयात तिची प्रसूती झाल्यानंतर हा प्रकार समोर आला.
पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जानेवारी २०२६ मध्ये पीडित मुलीच्या घराशेजारी राहणाऱ्या दोन चुलत भावांनी तिला जवळच्या माळरानावर नेऊन दोन ते तीन वेळा बळजबरीने अत्याचार केल्याचा आरोप आहे. भीतीपोटी मुलीने ही घटना कोणालाही सांगितली नाही.
दरम्यान, पोटदुखीचा त्रास झाल्याने मुलीला पुण्यातील ससून सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे तिची प्रसूती झाली. मुलगी अल्पवयीन असल्याने रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना संशय आला. त्यांनी भोर पोलिसांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी रुग्णालयात जाऊन पीडितेचा जबाब नोंदवला.
पीडितेच्या फिर्यादीवरून दोन्ही अल्पवयीन आरोपींविरोधात भोर पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यासह विविध गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास भोर पोलीस करत आहेत.
दरम्यान, काही दिवसांपूर्वीच भोर तालुक्यातील नसरापूर येथे चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणाने राज्यभर संताप व्यक्त झाला होता. त्या प्रकरणात दोषी ठरलेल्या भीमराव कांबळे याला न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली आहे. त्यानंतर भोर तालुक्यातील ही नवी घटना समोर आल्याने परिसरात पुन्हा संताप व्यक्त होत आहे.



## एमडी ड्रग्ज प्रकरणात महाराष्ट्र पोलिसांची तेलंगणात मोठी कारवाई

स्वप्नील गाडे, गुन्हे वार्ताहर

**मुंबई**: महाराष्ट्र पोलिसांच्या गुन्हे शाखेने तेलंगणातील संगारेड्डी जिल्ह्यात एमडी ड्रग्ज निर्मितीसाठी लागणाऱ्या रसायनांचा अवैध कारखाना उघडकीस आणला. या प्रकरणी हैदराबादचा रहिवासी रमेश बाबू साके याला २१ ऑक्टोबर रोजी अटक करण्यात आली. त्याच्याकडून ४४ किलो रासायनिक पावडर आणि सुमारे २७ लाख रुपये किमतीची प्रयोगशाळेची उपकरणे जप्त करण्यात आली. या प्रकरणातील अटकेची संख्या आता २५ झाली आहे.
या प्रकरणाचा तपास २४ जूनच्या रात्री नालासोपारा पूर्वेतील प्रगती नगर येथून सुरू झाला. पोलिसांनी अविनाश उर्फ सोनू लोकनाथ अय्यर आणि रविकांत ओमप्रकाश राम यांना अटक करून त्यांच्याकडून ३ लाख ३६ हजार रुपये किमतीचे ११२ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त केले होते. २५ जून रोजी तुळिंज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. तपासात गुजरातमधील कच्छ आणि



उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील अवैध कारखानेही उद्ध्वस्त करण्यात आले. या कारवायांत ६९ किलोहून अधिक एमडी ड्रग्ज, रोकड, २६० लिटर रसायने आणि प्रयोगशाळेची उपकरणे जप्त झाली.
या टोळीचे जाळे नालासोपारा, मुंबई, कल्याण, नेरळ, जळगावसह गुजरात, उत्तर प्रदेश आणि तेलंगणापर्यंत पसरले असून, त्यात औषध उत्पादक, रासायनिक पुरवठादार, तस्कर आणि वित्तीय लेखापालांचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पालघर पोलिसांची कारवाई; ६९.२४ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

पालघर प्रतिनिधी

पालघर जिल्ह्यातील तलासरी पोलिसांनी महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या केसरयुक्त पानमसाल्याची वाहतूक करणाऱ्या चालकाला अटक केली. या कारवाईत टेम्पोसह एकूण ६९ लाख २४ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.
१९ ऑक्टोबर २०२६ रोजी मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या एचआर ५५ एएन ७२८५ क्रमांकाच्या आयशर टेम्पोतून प्रतिबंधित पानमसाला, गुटखा व सुगंधी सुपारीची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती तलासरी पोलिसांना मिळाली. त्यानुसार दापचरी येथील महाराष्ट्र सीमा तपासणी नाक्यावर सापळा रचून टेम्पोची तपासणी करण्यात आली. विद्युत साहित्याच्या मागे ४९ लाख २४ हजार ८०० रुपयांचा प्रतिबंधित केसरयुक्त पानमसाला आढळला.
याप्रकरणी चालक रिंकू नरेश यादव (वय ३०, रा. बुलंदशहर, उत्तर प्रदेश) याला अटक करण्यात आली. तलासरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास मपोउपनि योगिता गुजर करीत आहेत.
पोलीस अधीक्षक यतिश देशमुख, अपर पोलीस अधीक्षक विनायक नरळे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी निशा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तलासरी पोलिसांनी ही कारवाई केली.



हे मराठी साप्ताहिक मालक, प्रकाशक, निखिल एकनाथ गाडे यांनी मुद्रक सोमानी प्रिंटिंग प्रेस गाळा नंबर 4, तळमजला, एन, के. इंडस्ट्रियल इस्टेट, आरे रोडच्या समोर, प्रवासी इंडस्ट्रियल इस्टेट,च्या बाजूला, गेट नंबर 2, गोरेगाव (पूर्व) मुंबई 400063 येथे छापून, 905, ओम साई एसआरए, हाऊसिंग सोसायटी लि. गणपत, मुंबई उपनगर 400051, महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपादक एकनाथ दगडू गाडे (मो 9821349985)